मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
स.प./न.प./ज.प.
आवक क्र. २७
दिनांक:- १२/०५/2022

# केंद्र शासनाचा माहिती मिळविण्याचा अधिकार – २००५

## नमुनापत्र – ३

महिती मिळविण्याकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
आवक क्र. ९६५ (मा.अ)
दाखल दि. १२/०५/२२
आयुक्त
मि.भा.म न पा

प्रति,
शासकीय महिती अधिकारी,
सचिव विभाग,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

| | | |
|---|---|---|
| १. | अर्जदाराचे नांव | : निला सोन्स ९८९२७१८१०० |
| २. | पत्ता | : ए/२०४, भैरव रेसीडेन्सी, लक्ष्मी पार्क, कनकिया रोड, मिरारोड |
| ३. | आववश्यक असलेल्या माहितीचा तपशिल | : BOT तत्वावरील मार्केट माहिती मिळणे बाबत. |
| ४. | माहितीचा विषय | : वरील प्रमाणे |
| ५. | माहितीशी संबधित कालावधी | : १ जानेवारी २०१४ पासुन |
| ६. | आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन | : १. BOT तत्वावरील मार्केटबाबत मा. महासभा व मा. स्थायी समिती सभेमध्ये प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यांच्या प्रती मिळाव्यात.<br>२. BOT तत्वावरील मार्केटबाबत मा. महासभा व मा. स्थायी समिती सभेमध्ये झालेल्या ठरावांच्या प्रती मिळाव्यात. |
| ७. | माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तींश: आवश्यक आहे किंवा कसे (प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये समाविष्ट केला जाईल. | : व्यक्तींश: |
| ८. | टपालाद्वारे असेल, त्याबाबतीत (सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र) | : शीघ्र |
| ९. | ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन | : माझ्या माहितीकरीता |
| १०. | अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे किंवा नाही | : नाही |

**ठिकाण: भाईंदर**
**दिनांक : १२-०५-२०२२**

Neelsones
अर्जदाराची स्वाक्षरी

52f- 653269

01C

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./260 /2022-23 दिनांक :- 24/ 5 /2022

**प्रति,**
**श्रीम. निला सोन्स,**
**ए/204, भैरव रेसीडेन्सी, लक्ष्मी पार्क,**
**कनकिया रोड, मिरारोड**

**विषय :-** **केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार 2005.**
**BOT तत्वावरील मार्केट माहिती मिळणेबाबत.**

**संदर्भ :-** **आपणाकडील दि. 12/05/2022 रोजीचा माहिती अधिकार अर्ज.**

**महोदया,**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण BOT तत्वावरील मार्केट बाबतमा. महासभा व मा. स्थायी समिती सभेमध्ये प्रशासनाने सादर केलेले गोषवारे व पारीत ठरावांच्या प्रतींची मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने मा. महासभा दि. 08/12/2017, प्रकरण क्र. 55 चा गोषवारा तसेच ठराव क्र. 52 ची प्रत व मा. महासभा दि. 26/02/2018, प्रकरण क्र. 93 चा गोषवारा, ठराव क्र. 92 ची प्रत आपणांस उपलब्ध करुन देत आहोत. उक्त कागदपत्रांसाठी लागणारे शुल्क प्रति पान रुपये 2/- याप्रमाणे एकूण 5 पानांकरिता रुपये 10/- (अक्षरी रुपये दहा मात्र) महानगरपालिका फंडात भरणा करुन पावतीची छायांकित प्रत जमा करुन माहिती घेण्यात यावी ही विनंती.

**(कैलास दामोदर म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी**
**नगरसचिव विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

Than. Rearience

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मिळकत विभाग

### मा. महासभा दि.०८/१२/2017

// गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ५५ )** :- मोकळ्या जागेत मार्केट शेड बांधणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत मोठ्या स्वरुपात मार्केट इमारती नसल्याने सद्यस्थितीत महानगरपालिकेमार्फत तसेच समावेशक आरक्षणाच्या तरतुदीतुन मार्केट इमारती बांधुन प्राप्त करुन घेण्याची प्रक्रीया सुरु आहे. शहरात विविध भागात मार्केट असणे आवश्यक असल्याने सुधारीत विकास योजनेत मार्केट आरक्षणे ठेवण्याची कामे प्रस्तावित आहेत.

सद्यस्थितीत संपुर्ण मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रस्त्यावर फेरीवाले बसत असुन नियमानुसार त्यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. याबाबत फेरीवाला धोरण तयार करण्याची प्रक्रीया देखील सुरु आहे.

महानगरपालिकेमार्फत शहर वासियांना मार्केट इमारती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असुन महानगरपालिकेच्या विकास योजनेतील महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या तथापी सद्यस्थितीत विकसित नसलेल्या अशा भुखंडावर, सार्वजनिक जागावर तात्पुरत्या स्वरुपात मार्केट शेड बांधल्यास रहिवाशांना मार्केट मध्ये जाऊन दैनंदिन लागणारा भाजीपाला व इतर वस्तु खरेदी करता येऊ शकतील. महानगरपालिकेमार्फत असे भुखंड निविदा प्रक्रीयाद्वारे खाजगी संस्थाकडुन तात्पुरत्या स्वरुपात विकसित करुन घेऊन चालविण्यास देता येतील, जेणेकरुन महानगरपालिकेस सदर मार्केट शेड व इतर सुविधासाठी खर्च न येता भाडे देखील मिळु शकेल व रस्ते मोकळे ठेवता येतील. तरी सदर प्रस्तावाबाबत विचार विनिमय करुन निर्णय होणेस शिफारस आहे.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली प्रत सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

(डॉ. नरेश गीते)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-4/2017-18/DK/MG-7

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.०८/१२/२०१७

## मिळकत विभाग

**प्रकरण क्रमांक ( ५५ ) :-** मोकळ्या जागेत मार्केट शेड बांधणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**प्रस्तावना :-** ५२

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या स्वरुपात मार्केट इमारती नसल्याने सद्यस्थितीत महानगरपालिकेमार्फत तसेच समावेशक आरक्षणाच्या तरतुदीतुन मार्केट इमारती बांधुन प्राप्त करुन घेण्याची प्रक्रीया सुरु आहे. शहरात विविध भागात मार्केट असणे आवश्यक असल्याने सुधारीत विकास योजनेत मार्केट आरक्षणे ठेवण्याची कामे प्रस्तावित आहेत.

सद्यस्थितीत संपुर्ण मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रस्त्यावर फेरीवाले बसत असुन नियमानुसार त्यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. याबाबत फेरीवाला धोरण तयार करण्याची प्रक्रीया देखील सुरु आहे.

महानगरपालिकेमार्फत शहरवासियांना मार्केट इमारती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असुन महानगरपालिकेच्या विकास योजनेतील महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या तथापी सद्यस्थितीत विकसित नसलेल्या अशा भुखंडावर, सार्वजनिक जागावर तात्पुरत्या स्वरुपात मार्केट शेड बांधल्यास रहिवाशांना मार्केट मध्ये जाऊन दैनंदिन लागणारा भाजीपाला व इतर वस्तु खरेदी करता येऊ शकतील. महानगरपालिकेमार्फत असे भुखंड निविदा प्रक्रीयाद्वारे खाजगी संस्थाकडुन तात्पुरत्या स्वरुपात विकसित करुन घेऊन चालविण्यास देता येतील, जेणेकरुन महानगरपालिकेस सदर मार्केट शेड व इतर सुविधासाठी खर्च न येता भाडे देखील मिळु शकेल व रस्ते मोकळे ठेवता येतील असा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**ठराव ( ) :-**

प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या विकास योजनेतील महापालिकेच्या ताब्यात आलेल्या व सद्यस्थितीत विकसीत नसलेल्या भुखंडावर, सार्वजनिक जागांवर तात्पुरत्या स्वरुपात मार्केट शेड बांधावे तसेच महानगरपालिकेमार्फत असे भुखंड निविदा प्रक्रीयाद्वारे खाजगी संस्थांकडून तात्पुरत्या स्वरुपात विकसीत करुन घ्यावेत व भाडे आकारावे. जेणेकरुन सदर मार्केट शेड व इतर सुविधांसाठी महापालिकेस खर्च होणार नाही तसेच आरक्षणाखाली बांधकाम अनुज्ञेय असलेल्या जागेवर मार्केट बांधणेसाठी परवानगी द्यावी असा मी ठराव मांडत आहे. आरक्षण वगळून खाजगी भुखंड धारकांनी त्यांच्या जागेत मार्केट सुरु करणेकरीता परवानगी मागितल्यास त्यांना तात्पूरत्या स्वरुपात मार्केट सुरु करणेकामी परवानगी देण्यात यावी.

**सुचक :-** Bhoir
श्री० गणेश भोईर

**अनुमोदन :-** [signature]
श्री० पंकज पांडेय

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

Dmehta

पिठासन अधिकारी

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात ... सत्यप्रत
... विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र. ( ९३ ) : मिरारोड (पुर्व) रामदेव पार्क येथील मिनाताई बाळासाहेब ठाकरे मार्केट (आरक्षण क्र. 231) भाडे दर व धोरण ठरविणेबाबत.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पुर्व) रामदेव पार्क भागात आरक्षण क्र. 231 मार्केटसाठी आरक्षित असून सदर जागेत तळमजल्यावर मार्केट व पहिला व दुसरा मजल्यावर सभागृह बांधण्यात आलेले आहेत. त्यापैकी दुसऱ्या तळमजल्यावरील सभागृह वातानुकूलीत आहे.

सदर इमारत पुर्णत्वास असून इमारतीचा वापर सुरू करावयाचा आहे. सदर सभागृहाचे खालीलप्रमाणे भाडे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| वातानुकूलीत सभागृह (दुसरा मजला) | रू.50,000/- प्रति दिन | रू.20,000/- अनामत रक्कम |
| विना वातानुकूलीत सभागृह (पहिला मजला) | रू.40,000/- प्रति दिन | रू.15,000/- अनामत रक्कम |

मिनाताई बाळासाहेब ठाकरे इमारतीचे दैनंदिन संचलन, देखभाल दुरूस्ती, सुरक्षा रक्षक, वीज बील, पाणी बील तसेच कर्मचारी वर्गावर मोठ्या प्रमाणावर खर्च येणार असून महानगरपालिकेस कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देखभाल व संचलन करणे शक्य होणार नाही. त्यामुळे सदर इमारतीमधील मार्केट व दोन्ही सभागृह दैनंदिन संचलन, देखभाल दुरूस्तीसाठी खाजगी संस्थेला निविदा प्रक्रियेव्दारे दिल्यास सदर संस्थेमार्फत महानगरपालिकेने ठरविलेले भाडे व अटीशर्तीनुसार सभागृह भाड्याने देऊन इमारतीची देखभाल, दुरूस्ती, वीज बील, पाणी बील चा खर्च करून कर्मचारी वर्ग देखील संस्थेमार्फत स्वखर्चाने उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच महानगरपालिकेस उत्पन्न देखील मिळेल. वरील प्रस्तावाबाबत विचार विनिमय होऊन निर्णय होण्यास शिफारस आहे.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात ... सत्यप्रत
... विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(डॉ. नरेश गीते)**
**आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

PC-6/DK/2017-18/ MG-4

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.26/02/2018.

### मिळकत विभाग

**प्रकरण क्र. ( 93 )** :- **मिरारोड (पुर्व) रामदेव पार्क येथील मिनाताई बाळासाहेब ठाकरे मार्केट (आरक्षण क्र. 231) भाडे दर व धोरण ठरविणेबाबत.**

**ठराव क्र. ( १२ )** :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पुर्व) रामदेव पार्क भागात आरक्षण क्र. 231 मार्केटसाठी आरक्षित असून सदर जागेत तळमजल्यावर मार्केट व पहिला व दुसरा मजल्यावर सभागृह बांधण्यात आलेले आहेत. त्यापैकी दुसऱ्या तळमजल्यावरील सभागृह वातानुकूलीत आहे.

सदर इमारत पुर्णत्वास असून इमारतीचा वापर सुरू करावयाचा आहे. मिनाताई बाळासाहेब ठाकरे इमारतीचे दैनंदिन संचलन, देखभाल दुरूस्ती, सुरक्षा रक्षक, वीज बील, पाणी बील तसेच कर्मचारी वर्गावर मोठ्या प्रमाणावर खर्च येणार असून महानगरपालिकेस कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देखभाल व संचलन करणे शक्य होणार नाही. त्यामुळे सदर सभागृह चालविण्यासाठी खाजगी संस्थेस देण्यात यावे.

| | | |
|---|---|---|
| **वातानुकूलीत सभागृह (दुसरा मजला)** | रू.20,000/- प्रति दिन | रू.10,000/- अनामत रक्कम |
| **विना वातानुकूलीत सभागृह (पहिला मजला)** | रू.15,000/- प्रति दिन | रू.10,000/- अनामत रक्कम |
| साफसफाई खर्च | रु.1000/- प्रति दिन | |
| वीज बील | प्रत्यक्ष वापरानूसार वीज कंपनीच्या दराप्रमाणे अधिक 10% सेवाकर | |
| खुर्ची भाडे | रु.10/- प्रति नग/ प्रति दिन | |
| कॅटरींग कंत्राटदाराकडून जेवण व्यवस्था असल्यास | रु.10/- प्रति प्लेट | |
| बाहेरून नाश्ता व्यवस्था असल्यास | रु.5/- प्रति प्लेट | |

सदर सभागृहासाठी खालील प्रमाणे धोरण ठरविण्यात येत आहे.

1) सदर सभागृह दैनंदिन संचलन, देखभाल व दुरूस्तीसाठी खाजगी कंत्राटदार नेमून करारनामा करून 5 वर्षे मुदतीसाठी हस्तांतरीत करण्यात यावे.
2) त्याच्याकडून रु.50.00 लक्ष अनामत रक्कम घेण्यात यावी.
3) सदर काम हे इतर कंत्राटदारास Sublet करता येणार नाही.
4) वरीलप्रमाणे ठरविलेले दर घेऊन मागणीनूसार संबधितांना सभागृह भाड्याने देण्यात यावे.
5) सभागृहाचे आरक्षण पारदर्शकरीत्या होण्यासाठी आवश्यक उपाययोजना करून नोंदी ठेवण्यात याव्या व आरक्षणाचा तपशिल दर्शविणारा फलक बसविण्यात यावा.
6) सदर सभागृहात महानगरपालिकेने बसविलेल्या व उपलब्ध असलेल्या साधन सामुग्री व्यतिरीक्त सर्व व्यवस्था कंत्राटदाराने करावयाची आहे.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात ... सत्यप्रत
मिरा भाईंदर महानगरपालिका

7) महानगरपालिकेने ठरविलेल्या वरील दरात दरवर्षी 1 एप्रिल रोजी 5% वाढ करण्यात यावी.

8) सदर सभागृह वर्षातील 10 दिवस महानगरपालिकेच्या कार्यक्रमासाठी विनामुल्य उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

9) तसेच महानगरपालिकेस कार्यालयीन/ शासकीय कामासाठी तातडीची सभागृहाची आवश्यकता असल्यास उपलब्ध करून द्यावे लागेल.

10) सदर सभागृहातील कार्यक्रमासाठी कोणत्याही कॅटरींग व डेकोरेटर्स यांना काम करण्याची मूभा राहील. त्यासाठभ् कंत्राटदारास सक्ती करता येणार नाही. मद्यपान अनुज्ञेय असणार नाही.

11) महानगरपालिकेच्या साधन सामुग्री व साहित्य व्यतिरीक्त डेकोरेटर्स यांनी बाहेरून साधन सामुग्री व साहित्य आणल्यास त्यांच्या होणाऱ्या बिलाच्या रकमेवर 10% सेवाकर घेण्यास मूभा राहील.

12) कंत्राटदार यांना सदर सभागृहाची दैनंदिन साफसफाई, वातानुकुलित यंत्रे लिफ्ट इ. साठी वार्षिक करार करून देखभाल व दुरूस्तीसाठी कंत्राटदार नेमावा लागेल व त्याची माहिती सादर करावी लागेल. तसेच सदर सभागृहात विनापरवानगी कोणताही बदल करता येणार नाही.

13) सदर सभागृहाची मिळकत विभागाने दर महिन्यास पहाणी करून मालमत्तेची देखभाल नाट होत असल्याची खात्री करावी व अटीशर्तीचा भंग होत असल्यास पुढील कारवाई प्रस्तावित करावी. तसेच काही तूट फुट झाली असल्यास निदर्शनास आणून त्वरीत दुरूस्ती कामे करून घ्यावीत.

14) सदर सभागृहातील सर्व वस्तू, सामान, साधन सामुग्रीची यादी करून कंत्राटदाराच्या ताब्यात देण्यात यावी व परत घेताना त्याची खात्री करावी. फर्निचर पॉलिश करून घ्यावे, सव्र तूट फुट दुरूस्ती करून घ्यावी, अनामत रक्कम देण्यापूवीर सदर इमारतीचे अंतर्गत रंगकाम व बाहेरील रंग खराब झाल्यास ते पुन्हा करून घेण्यात यावे अन्यथा अनामत रकमेतून काम करून घेण्यात यावे.

15) वरील प्रमाणे मंजूर दरात व अटीशर्तीत बदल करण्याचा अधिकार महानगरपालिकेने ठरवून ठेवला आहे.

16) सदर सभागृहाची देखभाल, दुरूस्ती व संचलन योग्य प्रकारे होत नसल्याचे अथवा अटीशर्तीचा भंग होत असल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ करारनामा रद्द करून अनामत रक्कम जप्त करून ताबा घेण्यात यावा. करून मार्केटच्या धोरणानुसार हॉल व मार्केट साठी एकत्र

17) वरील प्रमाणे अटीशर्तीचा व भाडे दराचा समावेश ~~करून~~ कंत्राटदार महानगरपालिकेस वार्षिक किती भाडे देईल, हे नमूद करून निविदा मागविण्यात यावी.

सुचक : Dr. Preeti J. Patil

अनुमोदक : (Rahul Shah)

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचुन कायम करण्यात आला** (श्री. राकेश शाह)

Dmehta

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात ... सत्यप्रत

... विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका